<u>प्रेसनोट</u> दि.०९.११.२०२३

विषय :- आर्मी ऑफिसर असल्याची बतावणी करून फसवणुक करणाऱ्या सायबर गुन्हेगारांचा राजस्थान राज्यामधुन शोध घेवुन आरोपींस अटक करून सायबर गुन्हा उघडकीस केल्याची बातमी सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेबाबत.

फिर्यादी यांचा बेंगलोर येथील फ्लॅट भाडयाने घेण्याच्या बहाण्याने आणि तो Army Officer असुन फिर्यादी यांना सदरचा फ्लॅट किती क्षेत्रफळाचा आणि त्याचे भाडे, डिपॉझिट इत्यादी विचारणा करून फिर्यादी यांचा विश्वास वाढविण्याकरीता त्यांचे Whats App वर त्याचे सुरक्षा दलाचा चालक परवाना, कॅन्टीन कार्ड, पॅनकार्ड, ओळखपत्र असे पूरावा कागदपत्र पाठवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन आणि दिशाभूल करून त्यांची एकुण रक्कम रू. १,९९,९८०/-ची फसवणुक केली होती. त्याअन्वये मलबारहिल पो.ठाणे गु.र.क्र. ८१/२०२३ क.४१९,४२० भादवी सह ६६ क,ड मातंका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा अनुषंगाने रकमेचा मनी ट्रायल काढला असता आरोपीने अमन ट्रेडर्स नावाच्या पीओएस चा वापर करून रक्कम काढल्याचे निष्पन्न झाले. सदर पीओएस हे भारत पे या वॉलेट चे असुन त्यावर लिंक असणाऱ्या बॅक खात्याची केवायसी ही मुपो उंचेडा ता.कमान जि.डिग राज्य राज्यस्थान या ठिकाणी असल्याचे माहिती प्राप्त झाली. तसेच केवायसी वरून मोबा.क्रमांक मिळवुन त्याचे लोकेशन पीओएस च्या पत्याशी मिळते असल्याने वरीष्ठांच्या आदेशाने राजस्थान येथे पोउपनि. सागर शिंदे व पथक रवाना करण्यात आले होते. आरोपीचे लोकेशन वेळोवेळी प्राप्त करून त्यास गावाबाहेर सापळा रचुन त्याला ताब्यात घेण्यात आले व सदर पो.ठाणे डिग येथे आणेन दि.०२/११/२०२३ रोजी नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. व मा. न्यायालसासमोर हजर करून आरोपीचा ट्राझिस्ट रिमांड घेवुन मलबारहिल पो.ठाणेचे पथक आरोपीस घेवुन मुंबई येथे आले.

तरी सदर गुन्हयांतील आरोपींचा कोणताही सुगावा नसतांना तांत्रिक पध्दतीने तपास करून मलबारहिल पो.ठाणेचे सायबर पथकाने परराज्यात राहुन नमुद आरोपींस पकडले व गुन्हा उघडकीस आणला.

तसेच गावदेवी पो.ठाणे येथे दाखल गु.र.क्र.३७९/२०२३ क.४१९,४२०भादवी सह ६६ क,ड मातंका मध्ये फिर्यादी यांची एकुन रू.१,९४,४०१/-ची फसवणुक झाली होती त्याचा तांत्रिक पध्दतीने तपास करून फिर्यादी यांच्या बॅक खात्यामध्ये रक्कम रूपये १,७०,१८०/-(९०टक्के) रक्कम परत मिळवुन दिली आहे. तसेच गुरक्र.३४८/२०२३ व ३८७/२०२३ क. ४१९,४२० भादवी सह ६६ क,ड मातंका मध्ये सुध्दा अनुक्रमे रूपये २६,८२,३००/- व ०२,१०,०००/- फ्रिज करण्यात स्पेशल सायबर सेल झोन ०२ गावदेवी पो.ठाणेचे सपोनिरी विकास शिंदे, पोउपनि पंकज होले व पोउपनि किरण जाधव यांना यश आले आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री अभिनव देशमुख, अप्पर पोलीस आयुक्त सो, दक्षिण प्रादेषिक विभाग मुंबई. मा. पोलीस उपायुक्त सो, श्री मोहीतकुमार गर्ग, परि.क्र. ०२, मुंबई, मा.सहा.पोलीस आयुक्त सो लक्ष्मण डुंबरे, गांवदेवी विभाग,सहायक पोलीस आयुक्त रवि सरदेसाई गिरगाव विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंग शिंगाडे वपोनि. विवेक भोसले, पो.नि. शैलेश अंचलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. सागर शिंदे, पोउपनि. विरसेन पाटील पोहवा मुन्ना सिंग,पो.शि. संदे, पो.शि. धारवारडकर,पो.शि. कदम यांनी केली आहे.